म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ब्रा-वा
दा. क्र. १२७४४

IRBK-0112744

पिल्यान पिल्या आवडत आलेल्या गोष्टी

रंपल-स्टिल्ट-स्किन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे, बालवाचनालय शाखा.
अनुक्रम ७६५३० वि. बालवाङ्मय
क्रमांक ३६०७ नोंद दि. ३०।३।७

म. ग्रं. सं. ठाणे, बालवाचनालय शाखा.
वा. क्र. ९२६७७ नों दि.
वि. बा.वा. क्र.

IRBK-0112744

वि ज्ञा न प्र का श न
"विद्याविकास", १९९५ सदाशिव, पुणें २

प्रकाशिका :

श्रीमती उमाबाई नेने,
१९९५ सदाशिव पेठ,
' विद्याविकास ' पुणें २.

❖ ❖

सजावट :

एस्. के. दाणी

❖ ❖ ❖

प्रकाशनकाल :

जून १९६९

❖ ❖ ❖

मुद्रक :

ज. ग. जोशी,
जनार्दन प्रेस,
पुणें २.

रंपल-स्टिल्ट-स्किन

फार फार वर्षांपूर्वी एका राज्यांत एक दळणाची गिरणी चालविणारा गरीब मनुष्य रहात होता. त्याला एक सोळा सतरा वर्षांची मुलगी असून ती दिसावयास फार सुरेख होती. शिवाय ती फार हुषार व धोरणी होती. या गिरणी चालविणाऱ्या गरीब माणसास स्वत:च्या मुलीचा फार अभिमान होता. तो आपल्या मुलीची सर्वांपुढें फार स्तुती करी. पुष्कळदा ही तारीफ वाजवीपेक्षा अधिक असे आणि एकदा तर त्याची व त्या देशाच्या राजाची कांहीं कारणाने गांठ पडली असता तो अभिमानाच्या भरात आपल्या मुलीची स्तुती करतांना बोलून गेला, "आणि राजेसाहेब, माझी मुलगी सुरेख तर आहेच, पण ती वाळलेल्या चाऱ्यापासून सोन्याचा धागा काढूं शकते!" हे ऐकतांच तो राजा एकदम खूष झाला. कारण तो राजा जरा द्रव्यलोभी होता. "तूं म्हणतोस त्याप्रमाणें तुझी मुलगी वाळलेल्या गवतापासून सोन्याचे सूत कातीत असेल तर ती खरोखरच हुषार असली पाहिजे. उद्यां तूं आपल्या मुलीला माझ्यासमोर घेऊन ये" त्या राजाने आज्ञा केली.

दुसऱ्या दिवशीं तो गिरणी चालविणारा मनुष्य आपली सुकुमार मुलगी घेऊन राजाकडे आला. राजा त्या मुलीला घेऊन राजवाड्यातील एका खोलींत गेला. या खोलींत राजाने वाळलेल्या गवताच्या चार गंजा, सुत काढण्याची एक चाती, एक स्टूल व कांहीं रिळें ठेवण्याची व्यवस्था केली होती. नंतर त्या मुलीकडे पाहून तो म्हणाला, "आता तूं कामाला लाग, आणि सकाळपर्यंत तूं या गवताचे सोने केले नाहीस तर मी तुला ठार मारण्याची शिक्षा देईन." राजाचे हे शब्द ऐकून तीं मुलगी फार भेदरून गेली. तिने त्या राजाचे मन वळविण्याची शिकस्त केली कारण तिला कापसापासून सुद्धां सुत वळता येत नव्हते ! मग ती चाऱ्यापासून सोन्याचा धागा कसा काढणार ? मात्र येवढ्यांत राजाने बाहेरून दरवाजा लावून त्याला कुलुप ठोकले व तो चालता झाला. आता ती खोलीत एकटी होती व त्या चातीवर डोके टेकून निपचित बसली होती. उद्या सकाळीं आपली काय स्थिती होईल याचा विचार मनांत येऊन ती ओक्साबोक्शी रडूं लागली.

मात्र येवढ्यांत एक अद्भुत घटना घडली ! बंद केलेला दरवाजा अचानक उघडला गेला व तिनें आयुष्यांत कधीं पाहिला नसेल अशा एका विचित्र मनुष्याने आंत प्रवेश केला. हा मनुष्य कमालीचा ठेंगू असून त्यानें तंग

तुमान, टोंकदार बूट व डोक्यावर कानटोपी चढविलेली होती.

"नमस्कार बाईसाहेब आपण अशा रडता कां ?" त्याने आपल्या विचित्र आवाजात प्रश्न केला.

"काय सांगू ! मला सकाळपर्यंत या वाळलेल्या गवतापासून सोन्याचे सूत वळवावयाची आज्ञा आहे आणि मला साधे सुत सुद्धां काढता येत नाही. शिवाय मी हे न केल्यास राजा मला ठार मारणार आहे" ती मुलगी मुसमुसत म्हणाली.

"मी हे जर तुझ्यासाठीं केलें तर तूं मला काय मोबदला देशील ?" त्या ठेंगु मनुष्याने प्रश्न केला. "माझी मोहनमाळ" तिने उत्तर दिले.

"ठीक आहे तर !" असे म्हणून तो ठेंगू मनुष्य त्या चातीजवळ स्टुलावर बसला व कांहीं अवकाशात त्याने त्या चार गंजा गवताचे सोन्याचे सूत तयार केले. पहांट होतांच मोहनमाळ घेऊन तो ठेंगू मनुष्य तो दरवाजा उघडून अदृश्य झाला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं दरवाजा उघडून राजा आला. त्या गवताचे सोन्यांत रूपांतर झाल्याचे पाहून तो एकदम खूष झाला. मात्र सोन्याच्या लोभाने तो अधिकच द्रव्यलोभी बनला. त्याने त्या मुलीस शाबासकी दिली व दुसऱ्या त्याहून एका मोठ्या खोलींत तिला तो घेऊन

गेला. या खोलींत आठ वाळलेल्या गवताच्या गंज्या, विणण्याची एक चाती रिळें व एक स्टूल होते राजाने पुन्हा तिला आज्ञा केली " सकाळपर्यंत या आठ वाळलेल्या गंजांपासून तू सोन्याचे सूत न काढल्यास मी तुला देहांताची शिक्षा देईन. " असे म्हणून राजाने पुन्हा ती खोली बाहेरून बंद केली व कुलुप लावून तो चालता झाला. ती मुलगी त्या आठ गवताच्या गंज्या पाहून पुन्हा घाबरून गेली व स्टुलावर चातीच्या शेजारी बसून ओकसाबोकशी रडूं लागली. मात्र क्षणांत पुन्हा खोलीचा दरवाजा उघडला गेला व तोच विचित्र भासणारा अत्यंत ठेंगू मनुष्य तिच्या समोर उभा राहिला. " या सबंध गवताचे सोने केल्यास तूं मला यावेळीं काय देशील ? " त्या ठेंगू माणसाने पुन्हा प्रश्न केला.

तिने जरा विचार केला व ती म्हणाली " मी माझ्या हातातील बहुमोल अंगठी तुला देईन. " लगेच त्या ठेंगू माणसाने तिची आंगठी तिच्यापासून घेतली व तो पुन्हा चातीवर बसून सोन्याचे सूत काढूं लागला. पहाटेपर्यंत खोलीतील सर्व रिळे सोन्याच्या सूताने भरली होती व त्या सर्व चाऱ्याचे सोन्यांत रूपांतर झाले होते. हे झाल्यावर त्या ठेंगण्या माणसाने दरवाजा उघडला व तो अदृश्य झाला.

सकाळीं तो राजा दरवाजा उघडून आला. खोलीतील सर्व चाऱ्याचे सोन्यांत रूपांतर झाल्यावर तो एकदम खूष

झाला. मात्र त्याचा द्रव्यलोभ वाढतच गेला. त्या मुलीची जेवणाखाण्याची सोय करून तो तिला यावेळीं आणखी एका मोठ्या खोलीत घेऊन गेला. या खोलींत वाळलेल्या गवताचा एक प्रचंड ढीगच्या ढीग ठेवलेला होता. जवळच सूत विणण्याची चाती, एक स्टूल व सूत गुंडाळण्यासाठी लागणाऱ्या रिळांचा एक प्रचंड ढीग होता. मात्र यावेळीं तो राजा तिला नीट समजावण्याच्या सुरांत म्हणाला, " सकाळपर्यंत या सर्व चाऱ्याचे तूं सोन्याचे सूत बनविल्यास मी तुझ्याशीं लग्न करीन व तुला माझी राणी करीन." असे म्हणून त्याने पुन्हा दरवाजा बंद केला व बाहेरून कुलुप लावून तो चालता झाला.

तो चाऱ्याचा प्रचंड ढीग पाहून ती गिरणीवाल्याची मुलगी अगदी हतबुद्ध झाली व स्टुलावर बसून चातीच्या कडेवर डोके टेकून पुन्हा मुसमुसून रडूं लागली.

दरवाजा अचानकपणें उघडला गेला व त्या विचित्र माणसाने खोलींत तिसऱ्यांदा प्रवेश केला. त्या मुलीच्या जवळ येऊन तो पुन्हा म्हणाला, " यावेळीं मी सबंध चाऱ्याचे सोन्याचे सूत वळल्यास तूं मला काय देशील ?" मात्र ती मुलगी खिन्नतेने त्याला म्हणाली, " यावेळीं तुम्हांला देण्यासारखे मजजवळ कांहीं नाही." यावर तो तिला म्हणाला, " हरकत नाही, तूं राणी झाल्यावर तुला

जे पहिले मूल होईल ते तूं मला देण्याचे कबूल करणार असशील तर या साऱ्या चाऱ्याचे सोन्याचे सूत मी करून टाकीन."

ही त्याची कठोर मागणी ऐकून ती मुलगी अगदी घाबरून गेली. मात्र तिने असा विचार केला, "मी राणी होईनच कशावरून ? आणि जरी झाले तरी मला लगेच मूल होईल तरी कशावरून ?" शिवाय आता दुसरा कसलाच उपाय नसल्यामुळें ती अखेर या गोष्टीस तयार झाली.

लगेच तो बुटका मनुष्य अत्यानंदाने त्या चातीजवळ बसला व व्हर्र ! व्हर्र ! असा जोरजोराने आवाज करणाऱ्या चातीने रात्रभर परिश्रम करून त्याने त्या चाऱ्याच्या प्रचंड ढीगाचे सोन्याच्या सूतांत रूपांतर केले. सकाळ होतांच दरवाजा उघडून तो विचित्र मनुष्य पुन्हा अदृश्य झाला.

सकाळीं राजा आला. त्या वाळलेल्या गवताच्या प्रचंड ढीगाचे सोन्यांत झालेले रूपांतर पाहून त्याचा आनंद गगनांत मावेना. त्याची आता पूर्ण खात्री पटली कीं, त्या गिरणीवाल्याची मुलगी अत्यंत स्वरूप सुंदर होतीच परंतु त्याचबरोबर तिने त्याला अत्यंत श्रीमंत केले होते. त्याने तिला दिलेले वचन पुरे करण्याचे ठरविले. लवकरच

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
अनुक्रम ८८५३० वि बालवाङ्मय
(७) ३६०७ क्रमांक नोंद दि. ३०।३।७९

प्रचंड थाटामाटांत त्याने तिच्याशीं लग्न केलें व आपल्या सिंहासनावर आपली राणी म्हणून तिला बसविलें.

ती एका गिरणीवाल्याची मुलगी आता एका राजाची राणी म्हणून ऐश्वर्य भोगू लागली व तिचे दिवस इतक्या सुखासमाधानांत जात होते कीं, चाऱ्याचे सोन्यांत रूपांतर करणाऱ्या त्या विचित्र ठेंगण्या माणसाबद्दल व त्याने तिच्यापासून घेतलेल्या कठोर वचनाची तिला आठवण राहिली नाही.

लग्न झाल्यावर सुमारे वर्षभराने राजाला व राणीला पुत्ररत्न झालें व त्या दोघांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. पुत्रजन्माचा आनंदोत्सव सर्वत्र साजरा झाला व आपल्या तान्ह्या मुलाचे कौतुक व संगोपन करण्यांत त्या तरुण राणीचा वेळ जाऊं लागला,

यानंतर दोन महिन्यांनी राणी नेहमीप्रमाणें आपल्या तान्ह्या मुलाला खेळवीत असता एक मनाला धक्का देणारी घटना घडून आली. खोलीचा दरवाजा अचानक उघडला गेला व त्या विचित्र भासणाऱ्या ठेंगू माणसाने खोलीत प्रवेश केला एव्हांपर्यंत राणी त्या ठेंगू माणसास व त्याने तिच्यापासून घेतलेल्या वचनास पार विसरली होती. त्यामुळे तो मनुष्य आपल्या पुढें उभा राहताच एखाद्या राक्षसाने अगर सैतानानें खोलीत प्रवेश करावा असे तिला

वाटले. तिने आपल्या लहानग्या बाळाला आपल्या हातात गच्च आवळले व ती भेदरलेल्या नजरेने त्या ठेंगू माणसा-कडे पाहूं लागली.

"आता तूं मला दिलेले वचन पुरे कर पाहूं!" त्या लहान मुलाकडे आपले बोट करून तो मनुष्य म्हणाला. तापलेले लोखंड कानात ओतावे असे त्या राणीला त्या माणसाचे शब्द कानावर पडताच वाटले.

डोळ्यांत पराकाष्टेची करुणा आणून ती त्या ठेंगू माणसास विनविण्याच्या स्वराने म्हणाली, "माझ्या राज्यातील कोणतीही मौल्यवान गोष्ट, सोने जडजवाहीर तूं माग ते मी तुला आनंदाने देईन परंतु मला या वचना-तून तूं मुक्त कर."

मात्र तो ठगू मनुष्य नकारात्मक हात करून म्हणाला, "तुझ्या राज्यातील सर्व किमतवान व मोलाच्या गोष्टीं-पेक्षा एक लहान मूल मला अधिक मोलाचे आहे!" हे शब्द ऐकताच ती राणी आपल्या बाळाला गच्च पकडून ओकसाबोकशी रडूं लागली. तिचा हा शोक पाहून त्या ठेंगू माणसाचे हृदय द्रवल्यासारखे दिसले व तो तिला म्हणाला, "मी तुला तीन दिवसांची मुदत देत आहे. या काळांत तूं माझे नांव काय आहे हे बरोबर ओळखलेस तर तुला आपले मूल तुझ्याजवळ ठेवण्याची मी परवानगी देईन."

येवढे बोलून तो ठेंगू मनुष्य तेथून चालता झाला. ती सारी रात्र राणीने जागून काढली. अथरुणांत पडल्या पडल्या तिला आठवतील तेवढी नानाविध चित्रविचित्र नांवे तिने आठवण्याचा प्रयत्न केला.

" तुझ्या राज्यातील सर्व किंमतवान व मोलाच्या गोष्टींपेक्षा एक लहान मूल मला अधिक मोलाचे आहे ! "

दुसऱ्या दिवशीं तो ठेंगणा मनुष्य तिच्या पुढें हजर झाला. राणीने रात्रभर मनात आठवलेली सर्व मुलांची व पुरुषांची नांवे त्याच्यापुढें एका पाठोपाठ म्हणून दाखविली. मात्र त्या विचित्र माणसाने आपली मान नकारात्मक हालविली व तो म्हणाला, " छे ! छे ! यांतील एकहि

नांव माझें नांव नाही." असे म्हणून तो मोठ्या आनंदांत तेथून चालता झाला. लगेच राणीने एका विश्वासू घोडेस्वारास आपल्या पुढें बोलावले व सबंध राज्यभर हिंडून तेथील सर्व मुलांची नानाविध नांवे गोळा करून आणण्यास त्याला सांगितले. त्याप्रमाणे सबंध दिवसभर उन्हातान्हातून राज्यभर हिंडून थकून भागून सायंकाळच्या सुमारास राज्यातील मुलांची नानाविध नांवे जमवून तो राणीपुढें आला. राणीने ती सर्व नांवे टिपून घेतली.

दुसरा दिवस उजाडला व तो विचित्र ठेंगू मनुष्य दरवाजा उघडून पुन्हां त्या राणीच्या पुढें येऊन उभा राहिला. राणीने आपल्या विश्वासू नोकराने आणलेली सर्व नांवे त्या ठेंगू माणसापुढें म्हटली. परंतु प्रत्येक नांव उच्चारल्यावर तो आपली मान नकारात्मक हलवी. तिची सर्व नांवे सांगून झाल्यावर तो म्हणाला, "यांतील एकहि नांव माझे नांव नाही. आता तुला फक्त एक संधि उरली आहे. बरे मी जातो!" असे म्हणून तो अधिकच आनंदाने तेथून निघून गेला.

आता तर राणी अधिकच काळजींत पडली. तिने आपल्या बाळाला आपल्या कडेवर घेतले व ती पुन्हा रडूं लागली. तिने आपल्या विश्वासू घोडेस्वारास पुन्हा बोलावले व सबंध राज्यभर हिंडून आणखी

कांहीं नांवे मिळतात का ते शोधण्यास तिने त्याला पाठवून दिले.

त्याप्रमाणें तो घोडेस्वार सबंध दिवस राज्यभर वणवण हिंडला व सायंकाळच्या सुमारास थकून भागून परत आल्यावर त्याने राणीची गांठ घेतली.

आत्र त्याचा चेहरा या वेळीं बराच निस्तेज दिसला. "राणीसरकार, मी सबंध राज्यभर आपल्या आज्ञेप्रमाणें भटक भटक भटकलों. परंतु मला एकहि नवें नांव मिळूं शकले नाही, कारण मी कालच राज्यातील सर्व चित्र-विचित्र नांवे जमा केली होती." नंतर किंचित थांबून तो म्हणाला, "तसे माझ्या कानावर एक अगदी विचित्र तऱ्हेचे नांव कांहीं निराळ्या घटनेमुळें पडले."

राणीने विचारले "कोणती ती घटना?" यावर तो घोडेस्वार म्हणाला, "राणीसरकार, सबंध दिवसभर घोड्यावर रपेट करून सायंकाळच्या सुमारास डोंगर चढून एका घनदाट जंगलाच्या शेवटास मी येत आहे एवढ्यांत माझ्या नजरेंत एक छोटी झोपडी आली. झोपडी समोर काटक्या कुटक्या जाळून विस्तव केला होता व तुमचा विश्वास सुद्धा बसणार नाही इतका एक गंमतशीर विचित्र ठेंगू मनुष्य विस्तवाभोवती नाचत असून मोठ्या आनंदाने टाळ्या वाजवीत तो खालील गाणें म्हणत होता--

" बाळ राणीचे आवडते
आणिन उद्यां मी येथें
नांवच माझे गंमतीचे
कोणालाच न उमजायाचे
'रंपल–स्टिल्ट–स्किन' ते साचे"

तो खालील गाणें म्हणत होता

घोडेस्वाराचे हे बोलणें ऐकल्यावर राणीचे सर्व दुःख पळाले व ती अत्यानंदाने टाळ्या वाजवूं लागली व आपल्या विश्वासू नोकराचे आभार मानून तिने त्याचा निरोप घेतला.

तिसऱ्या दिवशीं ठरल्याप्रमाणें तो विचित्र ठेंगणा मनुष्य तिच्यापुढें हजर झाला. सुरुवातीला जणूं आपल्याला त्याचे नाव माहिती नाही असा तिने बहाणा केला.

" काय तुझें नांव ' विट्कलढोज् ' तर नाही ? " तिने विचारले.

" छे ! साफ चूक ! " तो हंसून म्हणाला.

" बरं तुझें नांव ' सकनूसम् ' असे तर नाही ? " तिनें पुन्हा प्रश्न केला.

या वेळीं पण त्याने आपली मान नकारात्मक हलविली व तो अत्यानंदाने म्हणाला, " छे ! साफ चूक ! "

नंतर ती राणी जरा मिस्किलपणें म्हणाली, " आता सांग बरं, तुझें नांव ' रंपल–स्टिल्ट–स्किन ' तर नाही ना ? "

" आतां सांग बरं, तुझें नांव ' रंपल स्टिल्ट स्कीन ' तर नाही ना ! "

हे शब्द कानावर पडतांच तो विचित्र ठेंगणा मनुष्य क्रोधाने लाल झाला व चेहरा उग्र करून म्हणाला, " घात

झाला ! घात झाला ! एखाद्या चेटकिणीने तुला माझे नांव सांगितले असावे." असे म्हणून त्याने आपल्या टोंकदार बुटाचा उजवा पाय जमिनीवर इतक्या जोराने आदळला कीं, त्या लाकडी जमिनींत तो आडकून बसला. यावर त्याचा राग अधिकच उसळला. दोन्ही हाताचे बळ लावून मोठ्या प्रयासाने त्याने आपला पाय अखेर त्या भोकांतून सोडवून काढला.

येवढें झाल्यावर तो विचित्र ठेंगू 'रंपल–स्टिल्ट–स्किन' तेथून चालता झाला व पुन्हां तो कोणासच दिसला नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. बालवाचनालय शाखा.
अनुक्रम ७६५३० ... दि ०१/०८/०१३.७४
क्रमांक ३६०७ ....नोंद दि ३०/३/६९

म. ग्रं. सं. ठाणे, बालवाचनालय शाखा.
वा. क्र. ९२८ ....
वि. बा. वा .... क्र.

IRBK-0112744

IRBK-0112744

[illegible]